क्रमांक : कामगार/ब/४/ककनिस/22126
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.

दिनांक : 13.5.1994.

## :: परिपत्रक ::

विषय :- कर्मचारी कल्याण निधी समितीच्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

----

कर्मचारी कल्याण निधी समितीची २५ वी बैठक दिनांक १२.१.९४ रोजी प्रकाशगड, वांद्रे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१) मंडळाच्या आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणा-या नाटकास महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी कर्मचारी कल्याण निधीतून त्या नाट्यसंघास रुपये २५००/- ऐवजी रुपये ४०००/- मंडळाच्या धर्तीवर अनुदान देण्यात यावे.

२) माध्यमिक शालांत परिक्षा मंडळाच्या गुणवत्ता यादीत पहिल्या १ ते ५ क्रमांकात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना रुपये २०००/- व ६ ते १० क्रमांकात येणा-या पाल्यांना रुपये १०००/- खास पारितोषिक देण्यात यावे. तसेच ११ ते ५० क्रमांकात येणा-या पाल्यांना रुपये ५०० चे विशेष पारितोषिक देण्यात यावे.

गुणवत्ता यादीत येणा-या पाल्यांची नावे स्थानिक मुख्य अभियंत्यांकडून त्वरित मागावून घेण्यात यावीत. जेणे करुन मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई यांचेमार्फत शुभेच्छा पत्रासहित धनादेशाव्दारे खास पारितोषिकाची रक्कम अशा यशस्वी पाल्यांना त्वरित पाठवून त्यांना त्वरीत यथोचित गौरव करणे शक्य होईल.

३). मंडळाच्या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना मंजूर करण्यात आलेली पारितोषिके, क्षेत्रीय प्रविभागात राष्ट्रीय समारंभ, वर्धापन दिन किंवा स्थानिक पातळीवरील सुयोग्य दिनी अशा पाल्यांचा सत्कार करुन देण्यात यावीत.

.... २.

४) कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना मेंदू विकार शस्त्रक्रिया, (२) हृदय झडप बदलणे, हृदय शस्त्रक्रिया, (३) कॅन्सर, (४) मोठी अस्थिरोग शस्त्रक्रिया इ. शस्त्रक्रियेसाठी मंडळाने रुपये १०,०००/- आर्थिक मदत म्हणून तरतूद केलेली आहे.

परंतु अशा काही शस्त्रक्रिया पुनश्चः त्या अवलंबितांना रोगपरत्वे दुसऱ्यांदा करावी लागते. अशा प्रसंगी मंडळाच्या तरतुदीच्या धर्तीवर कर्मचारी कल्याण निधीतून रुपये १०,०००/- आर्थिक मदत देण्याची तरतूद केलेली आहे. तसेच मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रियासुद्धा वरीलप्रमाणे आर्थिक मदत देण्याच्या प्रकरणात अंतर्भाव केलेला आहे. अशा प्रकरणांसाठी रुपये ३ लाख (रुपये तीन लाख) आर्थिक मदत करण्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावेत व "प्रथम येईल त्यास प्राधान्य" या तत्वानुसार प्रकरणपरत्वे आर्थिक मदत देण्यात यावी.

५) ज्या कर्मचाऱ्यांची मालमत्ता भूकंपात नष्ट झालेली आहे अथवा खराब किंवा उध्वस्त झालेली आहे अशा कर्मचाऱ्यांना स्थानिक महसूल खात्याच्या अहवालांच्या आधारे पूर्ण तपास व चौकशी करून प्रत्येक प्रकरणी रुपये ५०००/- (रुपये पाच हजारपर्यंत) पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
व
सदस्य/सचिव
कर्मचारी कल्याण निधी समिती

प्रत -

प्रेषण यादीनुसार सर्वांना.

४) कर्मचा-यांच्या अवलंबितांना मेंदू विकार शस्त्रक्रिया, (२) हृदय झडप बदलणे, हृदय शस्त्रक्रिया, (३) कॅन्सर, (४) पोठी अस्थिरोग शस्त्रक्रिया इ. शस्त्रक्रियेसाठी मंडळाने रूपये १०,०००/- आर्थिक मदत म्हणून तरतूद केलेली आहे.

परंतु अशा काही शस्त्रक्रिया पुनश्च त्या अवलंबितांना रोगपरत्वे दुसऱ्यांदा करावी लागते. अशा प्रसंगी मंडळाच्या तराच्या शर्तीवर कर्मचारी कल्याण निधीतून रूपये १०,०००/- आर्थिक मदत देण्याची तरतूद केलेली आहे. तसेच मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रियेसुध्दा वरीलप्रमाणे आर्थिक मदत देण्याच्या प्रकरणात अंतर्भाव केलेला आहे. अशा प्रकरणांसाठी रूपये ३ लाख (रूपये तीन लाख) आर्थिक मदत करण्यासाठी आरक्षित ठेवण्यात यावेत व "प्रथम येईल त्यास प्राधान्य" या तत्वानुसार प्रकरणपरत्वे आर्थिक मदत देण्यात यावी.

५) ज्या कर्मचा-यांची मालमत्ता भूकंपात नष्ट झालेली आहे अथवा खराब किंवा उध्वस्त झालेली आहे अशा कर्मचा-यांना स्थानिक महसूल खात्याच्या अहवालांच्या आधारे पूर्ण तपास व चौकशी करून प्रत्येक प्रकरणी रूपये ५०००/- (रूपये पाच हजारपर्यंत) पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी.

(सही)

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

व

सदस्य/सचिव

कर्मचारी कल्याण निधी समिती

प्रत -

प्रेषण यादीनुसार सर्वांना.